महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

**क्र. १४४७(२)/२०२२/वीस** **दिनांक:- १० नोव्हेंबर,२०२३**

# प्रसिध्दीपत्रक

**विषय :- राज्य सेवा (मुख्य) परीक्षा- २०२२ मुलाखतीबाबत**

**संदर्भ :-१) पूर्व परीक्षा जाहिरात क्र. ०४५/२०२२, दि. ११ मे, २०२२ व**
**मुख्य परीक्षा जाहिरात क्र. ०९९/२०२२, दि. ११ नोव्हेंबर, २०२२.**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या राज्य सेवा (मुख्य) परीक्षा-२०२२ च्या लेखी परीक्षेचा निकाल दिनांक ११ ऑक्टोबर, २०२३ रोजी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे.

२. प्रस्तुत परीक्षेच्या निकालाआधारे मुलाखतीस अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखती दिनांक **३० नोव्हेंबर, २०२३ ते दिनांक १२ जानेवारी, २०२४** या कालावधीत आयोजित करण्यात आल्या आहेत.

३. मुलाखतीची केंद्र **नवी मुंबई, नाशिक, लातूर, छत्रपती संभाजी नगर, कोल्हापूर व नागपूर** अशी निश्चित केली आहेत.

४. नवी मुंबई केंद्रावरील मुलाखती आयोगाच्या नवी मुंबई येथील बेलापूर येथील कार्यालयात घेण्यात येतील. तसेच जिल्हा केंद्रावरील मुलाखतीचे ठिकाण स्वतंत्ररित्या प्रसिध्द करण्यात येईल.

५. मुलाखतीस पात्र उमेदवारांना मुलाखतपत्र त्यांच्या प्रोफाईल मध्ये उपलब्ध करून देण्यात येत आहे.

६. संबंधित उमेदवारांची यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

७. मुलाखतीस पात्र ठरलेल्या उमेदवारांनी मुलाखतीच्या दिवशी प्रमाणपत्रे / कागदपत्रे तपासणीच्यावेळी अर्जात केलेल्या दाव्यापृष्ठर्थ आवश्यक ती सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे. ती सादर न केल्यास मुलाखत घेतली जाणार नाही. तसेच मूळ प्रमाणपत्रे /कागदपत्रे सादर करण्याकरिता कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही.

ठिकाण :- नवी मुंबई

उपसचिव
(राजपत्रित परीक्षा)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.